महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला माळा, गडकरी चौक, जूना आग्रारोड, नाशिक
दुरध्वनी क्र. 0253-2575615, 2317938 फॅक्स क्र.2579208
ई-मेल:- admnctd.nsk-mh@gov.in
वेबसाईट:- https://tribal.maharashtra.gov.in

## सरळसेवा भरती -२०२३

गट(ब) अराजपत्रित संवर्ग व गट - क संवर्ग

## प्राथमिक शिक्षण सेवक(इंग्रजी माध्यम) शैक्षणिक अर्हतेबाबत

जाहिरात क्रमांक: आस्था- पद भरती-२०२२/प्र.क्र. १४२ / का.२(१)/ नाशिक दिनांक: २२ /११/२०२३ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये अनुक्रमांक १९ वर प्राथमिक शिक्षण सेवक(इंग्रजी माध्यम) हे पद नमूद आहे. या पदाकरीता संकेतस्थळावरील सविस्तर जाहिरातीमध्ये शैक्षणिक पात्रता व अनुभव नमूद करण्यात आलेला आहे.

सदर पदाची शैक्षणिक पात्रता ही उमेदवार हा इयत्ता 1 ते 10 वी इंग्रजी माध्यमामधून शिकलेला असावा किंवा 1 ते 12 वी इंग्रजी माध्यमामधून शिक्षण शिकलेला असावा तसेच DED पदविका इंग्रजी माध्यमातून केलेली असावी व TET उत्तीर्ण अनिवार्य आहे.

## स्पष्टीकरण

प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) या पदाकरीता अर्जदाराने लिंकवर अर्ज भरतांना इयत्ता 1 ते 10 वी चे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले आहे किंवा कसे या पर्यायावर NO पर्याय निवडला व त्यापुढील पर्यायात 1 ते 12 वी चे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले आहे किंवा कसे या पर्यायावर Yes हा पर्याय निवडला असेल तरी अशा उमेदवारांचा अर्ज स्विकारला जातो.

या बाबत विभागामार्फत खुलासा करण्यात येतो की, सदर पदाकरीता उमेदवारांचे 1 ते 10 वी चे शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच झाले असल्याचे बंधनकारक आहे तथापि, लिंक मध्ये अशा उमेदवारांनी या पर्यायासमोर No हा पर्याय निवडला तरी त्याला पुढील 1 ते 12 चे शिक्षण इंग्रजी माध्यमातून पर्याय उपलब्ध होतो. ह्या पर्यायात काही अर्जदाराचे केवळ 11 वी व 12 वी चे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले असल्याने त्यांनी तेथे Yes हा पर्याय निवडला तरी त्याचे 1 ते 10 वी चे मुळ शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले नसल्याने जरी अशा उमेदवाराचा अर्ज त्यांने भरलेल्या चुकीच्या माहितीमुळे स्विकारला गेला असेल तरी असा उमेदवार पात्र केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी व अशा उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सुयोग्य पदाकरीता अर्ज करावा.

स्वाक्षरीत/-
नयना गुंडे भा.प्र.से
आयुक्त,आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

स्थळ :- नाशिक

दिनांक - ०७ डिसेंबर २०२३

----***----